भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक १३.०६.२०२० ते १७.०६.२०२०)

| अंक ४६/२०२० | दिनांक १२.०६.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०५/०६/२०२० ते ११/०६/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १३/०६/२०२० ते १७/०६/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/०६ | ०६/०६ | ०७/०६ | ०८/०६ | ०९/०६ | १०/०६ | ११/०६ | दिनांक | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ | १७/०६ |
| ७.६ | ०.० | ७.८ | १८.२ | ३.२ | ०.० | ३५.२ | पाऊस (मि. मी) | १२६ | ११६ | १०७ | ७३ | ६४ |
| ३२.० | ३३.० | ३३.० | ३१.५ | ३१.५ | ३३.५ | ३३.५ | कमाल तापमान (अं. से) | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २३.५ | २३.० | २२.० | २४.० | २३.० | २५.५ | २३.० | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २३ | २४ | २४ |
| ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | |
| ९२ | ८१ | ९१ | ७५ | ८४ | ८९ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९४ | ९५ | ९६ | ९४ | ९४ |
| ७० | ६५ | ७० | ६८ | ७० | ६१ | ८६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ८९ | ९० | ९१ | ८९ |
| १.९ | १.१ | २.४ | २.० | १.१ | १.९ | २.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | १२ | १२ | १४ | १४ | १५ |
| पुर्वोत्तर /ईशान्य | स्थिर | उत्तरोत्तर/ वायव्य | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ वा-याची दिशा | पश्चिमे कडे | नैऋत्य कडे | नैऋत्य कडे | नैऋत्य कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्य कडे |
| उत्तरोत्तर/ वायव्य | उत्तरोत्तर/ ईशान्य | उत्तरोत्तर/ ईशान्य | ईशान्य | उत्तरोत्तर/ ईशान्य | दक्षिणोत्तर/ आग्नेय | पश्चिमोत्तर/ वायव्य | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | २३१.६ | २२८.४ | ७२.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमानामध्ये घट होण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर दिनांक १२ ते १५ जून २०२० दरम्यान काही ठिकाणी मुसळधारे ते अति मुसळधार तर दिनांक १६ व १७ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | येत्या आठवड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरी ज्या ठिकाणी भात पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल. |
| नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | येत्या आठवड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधारे स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरी ज्या ठिकाणी नागली पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | जमिन मध्यम ते भारी आणि चांगला निचरा होणारी निवडावी. पावसापुर्वीच जमिन खोल नांगरुन भुसभुशित करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळून घ्यावे.<br>खरीप हंगामातील भुईमुगाची पेरणी १० ते २० जुन पर्यंत करावी. येत्या आठवड्यात मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने भुईमुगाच्या पेरणीची पुर्व तयारी पावसाचा अंदाज पाहून करावी. |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | ❖ येत्या पाच दिवसामध्ये आद्रतेचे प्रमाण वाढणार असल्यामुळे आंबा पिकावरील नवीन पालवीवर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे व प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे.<br>❖ येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली कलमे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी.<br>❖ आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| काजु | नवीन लागवड | ❖ येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली कलमे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी.<br>❖ चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान झाले आहे, मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व त्या ठिकाणी बोर्डो पेस्ट लावण्याची व्यवस्था करावी<br>❖ चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान झाले आहे अश्या मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व जखम झालेल्या ठिकाणी रोठा या किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली रोपे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी.<br>नारळ व सुपारीच्या बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| भाजीपाला | पेरणी/लागवड | शेतातील पाण्याचा निचरा झाला असल्यास व जमीन वापश्याच्या स्थितीत असताना भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबूड, शिराळी ई. पीकांची पेरणी/लागवड करावी लागवड करण्यास योग्य हवामान असून पाऊसाचा अंदाज पाहून पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. पाऊसाचा अंदाज पाहूनच भाजीपाल्याची पेरणी / लागवड करावी. |
| कुक्कुटपालन | कोंबड्यांना रानीखेत रोगापासुन संरक्षण करण्यासाठी पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करुन घ्यावे. | |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |
|---|---|---|